महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३०५१ Email ID : napu22.mhpds@gov.in

---

क्र. अधापु २०२०/ प्र.क्र. ४९/ना.पु.२२ दिनांक : २७ मार्च, २०२०.

प्रति,

१) जिल्हाधिकारी, औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा

२) जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा.

**विषय :-** राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या राज्यातील १४ जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेप्रमाणे अन्नधान्याचा लाभ देण्यासाठी **माहे एप्रिल, मे व जून २०२०** करिता मासिक नियतन.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्रमांक अधापु-२०१५/प्र.क्र.१००/नापु-२२, दिनांक २४/०७/२०१५.
२) शासन परिपत्रक क्रमांक अधापु-२०१५/प्र.क्र.१००/नापु-२२, दिनांक ५/०८/२०१५.
३) शासन निर्णय क्रमांक असुका-२०१८/प्र.क्र.१/नापु-२२, दिनांक २१/५/२०१८.
४) केंद्र शासनाचे पत्र क्र. २/महाराष्ट्र/२०१५- बीपी-III(Pt.), दि. २६/०३/२०२० चे पत्र.

औरंगाबाद विभागातील औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती विभागातील अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व नागपूर विभागातील वर्धा या १४ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ देण्याकरिता केंद्र शासनाच्या संदर्भाधीन दिनांक २६.०३.२०२० च्या पत्रान्वये अन्नधान्याचे नियतन प्राप्त झाले आहे.

२. संदर्भ क्र. १ वरील दिनांक २४/७/२०१५ च्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेत समाविष्ट नसलेल्या उपरोक्त १४ जिल्ह्यातील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना अन्नधान्य देण्यासाठी याद्वारे **माहे एप्रिल,मे व जून २०२० या तीन महिन्यांच्या कालावधी** करिता अन्नधान्याचे मासिक नियतन मंजूर करण्यात येत असून जिल्हानिहाय अन्नधान्याच्या मासिक नियतनाचा तपशिल सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आला आहे.

शासन निर्णय दिनांक २४/७/२०१५ नुसार विहित केलेल्या परिमाणाच्या मर्यादेत गहू व तांदळाचे वाटप करावे.

३. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) मधील शिधापत्रिकाधारकांपैकी शेतकऱ्यांना प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांप्रमाणे प्रतिव्यक्ती ५ किलो अन्नधान्याचे वाटप करण्यात यावे. सदर योजनेच्या लाभाकरिता संदर्भाधीन दि. ५.८.२०१५ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे.

४. उपरोक्त लाभार्थ्यांना अन्नधान्य देण्याकरिता ते केंद्र शासनाकडून **ECONOMIC COST** दराने खरेदी करण्यात यावे. केंद्र शासन / भारतीय अन्न महामंडळाकडून ₹ २५०५.६७ प्रति क्विंटल दराने गहू व ₹ ३६०१.९१ प्रति क्विंटल दराने "अ" दर्जाचा तांदूळ खरेदी करण्यात यावा. लाभार्थ्यांना तांदूळ ₹ ३/- प्रतिकिलो व गहू ₹ २/- प्रतिकिलो या दराने धान्य वितरीत करण्यात यावे.

५. केंद्र शासनाच्या दि. २६.०३.२०२० च्या पत्रात नमूद केल्यानुसार सदर नियतनातील माहे एप्रिल, २०२० च्या अन्नधान्याकरिता भारतीय अन्न महामंडळाकडे रकमा जमा करण्याची व अन्नधान्याच्या उचलीची मुदत दि. २४ एप्रिल, २०२० पर्यंत राहील. माहे मे व जून, २०२० च्या अन्नधान्याकरीता भारतीय अन्न महामंडळाकडे रकमा जमा करण्याची व अन्नधान्याच्या उचलीची मुदत लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील मुदतीप्रमाणे म्हणजेच नियतन महिन्याच्या आधीच्या महिन्यातील शेवटच्या दिनांकापर्यंत राहील.

६. **सद्यस्थितीत e PoS व e PoS शिवाय अन्नधान्याचे वितरण होत असल्याने मागील महिन्यात e PoS व e PoS शिवाय झालेल्या वितरणानंतर पुढील महिन्याकरिता वाटपासाठी आवश्यक असलेल्या अन्नधान्याचा आढावा घेण्यात यावा. त्यानुसार पुढील महिन्यासाठी अन्नधान्याची उचल करताना गोदामामध्ये अतिरिक्त साठा जमा होणार नाही, याद्दष्टीने गोदामातील मागील महिन्यापर्यंतच्या अन्नधान्याची शिल्लक विचारात घेऊन याद्वारे दिलेल्या नियतनापैकी आवश्यकते एवढ्याच अन्नधान्याची उचल करावी.**

७. शासनाचे सदर नियतन मंजूरीचे आदेश उपआयुक्त (पुरवठा) यांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आले आहेत. नियतन मंजूरीचे आदेश प्राप्त न झाल्यामुळे अन्नधान्याची विहित मुदतीत उचल करता आली नाही व त्यामुळे नियतन व्यपगत झाले, ही सबब विचारात घेतली जाणार नाही व याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

८. सार्वजनिक वितरण व्यवस्था (नियंत्रण) आदेश, २०१५ मधील तरतुदीनुसार "उपयोगिता प्रमाणपत्र" नियमितपणे सादर करणे अनिवार्य आहे.

९. सोबतच्या विवरणपत्रातील नियतनाच्या तक्त्यामध्ये दर्शविलेल्या परिमाणानुसारच लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण करणे अनिवार्य आहे.

१०. **माहे एप्रिल, मे व जून २०२०** या कालावधीसाठी उक्त लाभार्थ्यांकरीता नियतनानुसार गहू व तांदुळाचा साठा मुक्त करण्याच्या सूचना भारतीय अन्न महामंडळास स्वतंत्रपणे देण्यात आल्या आहेत.

(सतीश सुपे)
शासनाचे सह सचिव

सोबत :- विवरणपत्र.

प्रत:- १) उप आयुक्त (पुरवठा) औरंगाबाद, अमरावती, नागपूर

त्यांना सूचित करण्यात येते की, नियतनाचे आदेश सर्व संबंधित जिल्हयांना ई-मेल व पत्राद्वारे पाठविण्यात आले आहेत. आपल्या विभागातील जिल्हयांना सदर आदेश प्राप्त झाले किंवा कसे याबाबत खातरजमा करण्यात यावी. आपल्या विभागातील सर्व जिल्हयांमध्ये नियतनानुसार धान्याची उचल होत असल्याची व त्याबाबतची माहिती "महाफूड" आज्ञावलीत तसेच Google Drive वर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या विवरणपत्रात दर आठवडयास भरली जात असल्याबाबत योग्य ती दखल घ्यावी.

२) उपसंचालक, नागरी पुरवठा,पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई, यांनी प्रस्तुत नियतनानुसार जिल्हयांनी केलेली उचल व वाटप याबाबतचा तपशील "महाफूड" आज्ञावलीद्वारेच तसेच Google Drive वर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या विवरणपत्रात प्राप्त करुन घ्यावा.

३) अवर सचिव, संगणक कक्ष, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांनी प्रस्तुत नियतनाची प्रत विभागाच्या संकेतस्थळावर अपलोड करावी.

(सतीश सुपे)
शासनाचे सह सचिव

प्रत :- १) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई
२) निवड नस्ती (कार्यासन, नापु-२२)

| शासन पत्र क्र. अधापु-२०२०/प्र.क्र.४९/नापु-२२, दि.२६.०३.२०२० सोबतचे विवरणपत्र | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| माहे एप्रिल, मे व जून २०२० करिता मासिक नियतन | | | | | | | |
| राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) मधील लाभार्थ्यांपैकी शेतकरी | | | | | | | |
| अ.क्र | जिल्हा | लाभार्थी सदस्य संख्या | नियतनाचे परिमाण | | दरमाह मासिक नियतन (मे.टन) | | |
| | | | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | एकूण अन्नधान्य |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | औरंगाबाद | ३,९६,६७३ | ३ | २ | १,१९० | ७९३ | १,९८३ |
| २ | जालना | १,७३,६७८ | ३ | २ | ५२१ | ३४७ | ८६८ |
| ३ | नांदेड | ४,६७,९७० | ३ | २ | १,४०४ | ९३६ | २,३४० |
| ४ | बीड | ६,४२,३७६ | ३ | २ | १,९२७ | १,२८५ | ३,२१२ |
| ५ | उस्मानाबाद | ४,१४,४०९ | ३ | २ | १,२४३ | ८२९ | २,०७२ |
| ६ | परभणी | २,९९,०९२ | ३ | २ | ८९७ | ५९८ | १,४९५ |
| ७ | लातूर | ३,२७,२६० | ३ | २ | ९८२ | ६५५ | १,६३७ |
| ८ | हिंगोली | २,०२,४८० | ३ | २ | ६०७ | ४०५ | १,०१२ |
| ९ | अमरावती | ६,०३,३३२ | ३ | २ | १,८१० | १,२०७ | ३,०१७ |
| १० | वाशिम | १,८०,०४६ | ४ | १ | ७२० | १८० | ९०० |
| ११ | अकोला | २,५२,९३० | ४ | १ | १,०१२ | २५३ | १,२६५ |
| १२ | बुलढाणा | ३,८२,०१७ | ४ | १ | १,५२८ | ३८२ | १,९१० |
| १३ | यवतमाळ | ४,०५,२१५ | ३ | २ | १,२१६ | ८१० | २,०२६ |
| १४ | वर्धा | १,५२,४९१ | ३ | २ | ४५७ | ३०५ | ७६२ |
| एकूण | | ४८,९९,९६९ | | | १५,५१४ | ८,९८५ | २४,४९९ |

Scanned with CamScanner

**Government of Maharashtra**

Food, Civil Supplies & Consumer Protection Department,
Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,,
Mantralay Annex, Mumbai-400 032

Telephone: 022-22793051
Email ID : napu22.mhpds@gov.in

---

No.- Adhapu-2020/C.R.49/CS-22, Date :- 27th March, 2020.

To,

The General Manager (Mah),
Food Corporation of India,
Regional Office (Maharashtra),
FSD Complex, Dattapada Road, Rajendra Nagar,
Borivali (E), Mumbai – 400 066.

**Sub :- Allocation of Foodgrains for APL (Saffron) cardholder farmers not included under NFSA, 2013 for the month April, May and June 2020.**

**Ref :-** 1) Govt. of India letter No.2/Maharashtra/2015-BP-III(Pt), Dt.26.03.2020.
2) State Govt. Letter of even no. Dtd. 26th March, 2020.

Sir,

Government of India (GOI) vide its above referred letter dated **26.03.2020** has sanctioned additional allocation of wheat and rice for APL farmers of 14 drought affected suicide prone districts at **ECONOMIC COST.** Accordingly, State Government has issued districtwise allocation orders for the same for the month **April, May and June 2020** vide above referred letter dated 26th March, 2020 (copy enclosed). State Government has also instructed its field authorities to purchase foodgrains at **ECONOMIC COST.** i.e. ₹ 2505.67 per Quintal for Wheat and ₹ 3601.91 per Quintal for "A" Grade Rice.

Validity period for cost deposit and lifting of foodgrains for the allocation for the month of April, 2020 will be up to 24th April, 2020 and for the month of May and June, 2020 will be as per Targeted Public Distribution System i.e. last day of the month preceding the allocation month.

You are therefore requested to release the allocated quota to the nominees of District Collectors as per the statement attached under intimation to this Government. This being the very sensitive issue, you are requested to give instructions to your regional offices to allow these district officials to lift the foodgrains as early as possible.

Yours faithfully,

**(Satish Supe)**
**Joint Secretary, Government of Maharashtra**

Copy to: 1) Financial Advisor & Deputy Secretary, F.C.S. & C.P. Dept, Mumbai.
3) Select file, Desk CS-22.

C:\USERS\ANIL.SAWANT\DESKTOP\FARMER ALLOCATION APRIL TO JUNE, २०२०.DOCX६